जोडपत्र -२ (For Website)

# -: जाहिरात :-

## विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक

दि. .०५.२०२६

विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक यांचे अधिनस्त असलेल्या पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण, अहिल्यानगर, जळगांव, धुळे व नंदुरबार कार्यालये व उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयांकरीता अनुक्रमे "विधी अधिकारी गट-ब" ची ०३ पदे आणि "विधी अधिकारी" यांची १८ पदे अशी एकुण २१ पदे ११ महिन्यांच्या पूर्णत: कंत्राटी पध्दतीने भरणेकामी विहित अटी व पात्रता पूर्ण करीत असलेल्या उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | जिल्हा | विधी अधिकारी गट ब | विधी अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | नाशिक ग्रामीण | ०१ | ०५ |
| २ | अहिल्यानगर | ०० | ०६ |
| ३ | जळगांव | ०० | ०३ |
| ४ | धुळे | ०१ | ०१ |
| ५ | नंदुरबार | ०१ | ०३ |
| | एकुण | ०३ | १८ |

१. वर दिलेल्या पदसंख्येत/ नियुक्तीच्या ठिकाणात बदल होवू शकतो. त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकाऱ्यांस राहतील.

२. विधी अधिकारी गट ब व विधी अधिकारी या पदांकरिता करावयाचे अर्ज ***पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण-४२२००३*** यांचे कार्यालयात हस्ते किंवा पोस्टाने **दिनांक २५.०५.२०२६ पर्यंत** कार्यालयीन वेळेत सादर करावे. **दिनांक २५.०५.२०२६ रोजी** कार्यालयीन वेळेनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. तसेच अपूर्ण/ अर्धवट विनंती अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

३. अर्जाचा नमुना सोबत जोडलेला आहे. **प्रत्येक पदासाठी पात्र उमेदवारांनी स्वतंत्र अर्ज करावेत.** सदर अर्ज लिफाफ्यात घालून उजव्या बाजूला ठळक अक्षरात विधी अधिकारी गट - ब पदासाठी अर्ज / विधी अधिकारी पदासाठी अर्ज असे नमुद करावे.

४. अर्जासोबत पासपोर्ट साईजचे ०२ फोटो, शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती जोडाव्यात. अर्जासोबत पत्रव्यवहाराकरीता उमेदवाराचा पत्ता असलेले दोन लिफाफे जोडावे.

## करारातील मासिक देय रक्कम

अ) विधी अधिकारी गट -ब या पदाकरिता एकत्रीत अनुज्ञेय मासिक देय रक्कम रू.२५,०००/- + दुरध्वनी व प्रवास खर्चाकरिता रू. ३,०००/-असे एकुण रू.२८०००/- दरमहा देय राहील या व्यतिरीक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

ब) विधी अधिकारी या पदाकरिता एकत्रीत अनुज्ञेय मासिक देय रक्कम रू.२००००/- + दुरध्वनी व प्रवास खर्चाकरिता रू.३०००/-असे एकुण रू.२३,०००/- दरमहा देय राहील या व्यतिरीक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

## शैक्षणिक अर्हता व वयोमर्यादा अनुभव

१. **शैक्षणिक अर्हता :-** उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कायद्याचा पदवीधर असेल. तो सनदधारक असेल.

२. विधी अधिकारी गट - ब व विधी अधिकारी या दोन्ही पदांसाठी **वकिली व्यवसायाचा** किमान ५ वर्षांचा अनुभव आवश्यक राहील.

३. उमेदवार गुन्हेगारी विषयक, सेवाविषयक, प्रशासनीक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थितीत तथा विभागीय चौकशी इ. बाबतीत ज्ञानसंपन्न असेल ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.

४. उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असेल.

५. **उमेदवाराचे वय:-** विधी अधिकारी गट ब व विधी अधिकारी या दोन्ही पदांसाठी उमेदवाराचे वय नियुक्तीचे वेळी ६० वर्षांपेक्षा जास्त नसेल.

किंवा

६. जी व्यक्ती शासकीय सेवेत असताना प्रत्यक्षपणे विधीविषयक कामकाज हाताळत होती आणि ज्या व्यक्तीस गुन्हेगारी, प्रशासकीय व सेवाविषयक कायद्यांविषयक सखोल ज्ञान असेल त्याचप्रमाणे मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रस्थापित समकालीन कायद्याचे ज्ञान असेल अशा व्यक्तीची शासकीय सेवा ही केवळ अनुभवासाठी ग्राहय धरण्यात येईल. सदर व्यक्तीस नियुक्तीबाबतच्या अन्य अटी लागू राहातील. शासकीय सेवेत कार्यरत व्यक्ती निवडीस अपात्र असेल.

## विधी अधिकारी गट ब आणि विधी अधिकारी यांची कर्तव्ये व जबाबदा-या :-

१. कार्यालयाकडे प्राप्त होणा-या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबींबाबत/न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.

२. सेवाविषयक /प्रशासकीय बाबी/विभागीय चौकशा तथा समकालीन कायद्याची प्रस्थापीत स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.

३. प्रलंबीत न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकीलाकडे पाठपुरावा करणे, जेथे शासन प्रतिवादी आहे अशाप्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञापत्र संबंधीत अधिका-यांच्या मदतीने तयार करणे.

४. शपथपत्राचा मसुदा तयार करणे व त्यास समक्ष प्राधिका-याची मान्यता घेऊन न्यायालयात विहीत मुदतीत सादर होईल हे पाहाणे.

५. जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे अशा प्रकरणामध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करून तदनुषंगाने अपील दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.

६. अपील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपीलाचा मसुदा तथार करून तो संबंधीत सरकारी वकीलाकडे पाठविणे व अपिलाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे.

७. विधी विषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमून दिलेले कार्य विहीत मुदतीत पार पाडणे.

८. पोलीस स्टेशनमध्ये प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यास योग्य ती मदत करणे.

अटी व शर्ती

१. सदर पदांची नेमणूक ही पुर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल. उमेदवारांना शासकीय अधिकारी/ कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.

२. सदर नेमणुका या करार पध्दतीने प्रथमत: ११ महिन्यांसाठी करण्यात येतील. ११ महिन्यांनंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवळी ( जास्तीत जास्त ३ वेळा , ११ महिन्यांकरीता) वाढविता येईल. त्यानंतर अशा उमेदवाराची पुनश्च नियुक्ती करणे आवश्यक आहे असे सक्षम प्राधिकाऱ्याचे मत झाल्यास त्या उमेदवारास पुनश्च निवड प्रक्रियेस सामोरे जावे लागेल.

३. करार पध्दतीने नेमणुक करण्यात येणा-या अधिकारी/कर्मचा-यांना एकत्रित वेतन आणि अनुज्ञेय दुरध्वनी व प्रवास खर्चाव्यतिरीक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

४. निवड केलेला उमेदवार ११ महिन्याच्या कराराच्या कालावधीत वकीली व्यवसायाशी संबंधीत कोणत्याही प्रकारचे खाजगी काम/ व्यवसाय नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या लेखी परवानगीशिवाय करु शकणार नाही. जर नियुक्ती प्राधिकाऱ्याने सदर बाबतची परवानगी नाकारली असेल आणि परवानगी नाकारल्यावरही उमेदवाराने खाजगी व्यवसाय सुरु ठेवला असेल व तसे करण्याने शासनाच्या कामात व्यत्यय किंवा आर्थीक नुकसान होत असेल तर अशा उमेदवारांची नियुक्ती रद्द करण्यात येईल. अशा उमेदवारांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

५. उमेदवाराची निवड लेखी परीक्षेद्वारे तसेच मुलाखतीद्वारे करण्यात येईल. लेखी परीक्षेतून जेवढी पदे भरावयाची आहेत त्याच्या तीन पट उमेदवार तोंडी परीक्षेस बोलविण्यात येतील. परीक्षेचा तसेच मुलाखतीचा दिनांक यथावकाश कळविण्यात येईल.

६. लेखी परीक्षा ५० गुणांची व तोंडी परीक्षा २५ गुणांची असेल. नियुक्ती देणेसाठी कमीत कमी ६० % गुण असणे आवश्यक आहे.

७. लेखी परीक्षा ही कायदेविषयक बाबी उदा. (अ) मा. उच्च न्यायालय, मा. म.प्र. न्यायाधिकरणा समक्ष सादर करावयाचे प्रतिज्ञापत्र किंवा शपथपत्र (ब) सेवाविषयक आणि फौजदारी स्वरुपाची प्रकरणे (क) ला.प्र. विभागाच्या सापळा प्रकरण किंवा फौ. प्र.सं. १९७५ मधील कलम १९७ किंवा महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी अधिनियम १९९९ मध्ये मंजूरीमधील प्रकरणांत अभियोग दाखल करण्यासाठीची परवानगी देणे किंवा न देणे याबाबत निर्णय घेता येणे सुलभ होईल अशा प्रकरणांची छाननी करण्याची क्षमता (ड) सेवाविषयक किंवा फौजदारी प्रकरणांतील वेगवेगळया महत्वाच्या मुद्यांवर सध्याची न्यायीक स्थिती. इत्यादी विषयांवर घेण्यात येईल.

८. उमेदवारास कोणताही प्रवासखर्च अनुज्ञेय होणार नाही.

८. उमेदवारास नियुक्तीचे वेळी या कार्यालयामार्फत देण्यात येणारा करारनामा (Agreement) भरणे अनिवार्य राहील.

९. उमेदवाराने वर विहीत केलेल्या अर्हता, वयोमर्यादा व अनुभव व इतर सर्व अटी **दिनांक ०६/०५/२०२६** पर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे.

१०. विधी अधिकारी गट- ब या पदावरील नियुक्तीस पात्र ठरणाऱ्या उमेदवारास संबंधीत जिल्हयाच्या पोलीस अधीक्षक कार्यालयाचे ठिकाणी व विधी अधिकारी यांना संबंधीत जिल्हयाच्या उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाचे ठिकाणी काम करणे बंधनकारक राहील.

११. उमेदवाराने अर्जासोबत २.५ से.मी. x २.५ से.मी. आकाराचे सध्याचे काढलेले २ रंगीत फोटो जोडावेत.

( दत्तात्रय कराळे )
विशेष पोलीस महानिरीक्षक,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक

अर्जाचा नमूना

# विधी अधिकारी गट-ब / विधी अधिकारी पदाकरिता अर्ज

| कार्यालयीन उपयोगासाठी |
| --- |
| अर्ज क्रमांक :- ☐☐☐☐ |
| अर्ज स्विकारल्याचा दिनांक :- |
| अर्ज स्विकारण्याची स्वाक्षरी दिनांकासह :- |

एका फोटोवर स्वाक्षरी करुन या जागी चिकटवावा व दुसरा फोटो स्वाक्षरी करुन अर्जासोबत लिफाफयात जोडवा.

सूचना : १) अर्जातील अंक फक्त इंग्रजीत लिहावेत.
२) अर्जदाराने माहिती मराठीत लिहावी व # दर्शविलेल्या ठिकाणची माहिती फक्त इंग्रजीत लिहावी.
३) *आवश्यक नसेल तेथे खोडावे.

- **ज्या पदासाठी इच्छूक आहात त्या पदाचे पदनाम :-** विधी अधिकारी गट-ब ☐ विधी अधिकारी ☐
( इच्छूक असलेल्या फक्त एकाच पदाच्या रकान्यात ✔ अशी खूण करावी.)

अर्जदाराची वैयक्तीक माहिती :-

१. **अर्जदाराचे संपूर्ण नाव :** आडनाव: नाव वडिलांचे/पतीचे नाव

मराठीत :- ..............................................

#इंग्रजीत :- ..............................................

२. **पत्रव्यवहाराचा पत्ता :** ____________________

तालुका.....................जिल्हा................पीनकोड ☐☐☐☐☐☐

३. **कायमचा पत्ताचा** : - ____________________

तालुका.....................जिल्हा.................पीनकोड.. ☐☐☐☐☐☐

४. **दुरध्वनी क्रमांक** :-

| लॅन्डलाईन | | मोबाईल :- | | | | | | | | | | |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |

४ (A) ई-मेल :- ____________________

५. **जन्मदिनांक** :- ☐☐ ☐☐ ☐☐☐☐ जन्म स्थळ :-................
दिवस महिना वर्ष

६. दिनांक १/१२/२०२२ रोजीचे वय : ☐☐ ☐☐ ☐☐☐☐
दिवस महिने वर्ष

७. लिंग: - पुरूष ☐ महिला ☐
(योग्य असेल त्या ठिकाणी ( ✔ ) अशी खूण करावी.)

८. धर्म : ---------------- जात: ---------------- जातप्रवर्ग - ----------------

९. महाराष्ट्र राज्याचे रहिवासी आहात का ? होय ☐ नाही ☐
(योग्य असेल त्या ठिकाणी ( ✔ ) अशी खूण करावी.)

१०. **अर्जदाराची शैक्षणिक माहिती :**

**(अ) शैक्षणिक अर्हता:-**

| शिक्षण | शैक्षणीक संस्थेचे नाव विद्यालय/महाविद्यालय | बोर्ड/विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचा दिनांक | मिळालेले गुण | मिळालेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| माध्यमीक शालांत प्रमाणपत्र परीक्षा | | | | | |
| उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा | | | | | |
| पदवी | | | | | |
| विधी पदवी | | | | | |
| | | | | | |

१० (ब) **इतर शैक्षणिक अर्हता:-**
संगणक प्रशिक्षीत आहे काय ? होय ☐ नाही ☐

११. **अर्जदाराची इतर माहिती :-**

अ. सनद घेतल्याचा दिनांक :-

ब. उमेदवाराने स्वत : हाताळलेल्या केसेसचा तपशील:

| अ.क्र | न्यायालयाचे नाव | केसेसचा प्रकार | केसेसच्या संख्या |
|---|---|---|---|
| | | | |

**टिप :** - वकीली व्यवसायाचे अनुभवाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

१२. यापूर्वी कोठे नोकरी केली आहे काय ? होय ☐ नाही ☐
( असल्यास, त्याबाबत खालील तक्त्यात तपशिल द्यावा)

| अ.क्र. | संस्थेचे नाव | अर्जदार कोणत्या पदावर काम करत होता / आहे | सेवा कालावधी | | सेवा सोडण्याची कारणे |
|---|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत | |
| | | | | | |

१३ (अ) अर्जदारावर यापूर्वी कोणत्याही अपराधाबाबत कधीही अटक करण्यात / स्थानबध्द करण्यात / बध्द करण्यात / दंड करण्यात / सिध्ददोषी ठरविण्यात आले आहे काय ? किंवा लोकसेवा आयोगाकडून त्यांच्या परीक्षांना / निवडींना बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय ? किंवा अनर्ह ठरविण्यात आले आहे काय ? किंवा कोणत्याही विद्यापीठाकडून किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणाकडून / संस्थेकडून कोणत्याही परिक्षेस बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय ? / काढून टाकण्यात आले काय ? होय ☐ नाही ☐

(ब) हा अर्ज भरतेवेळी काणत्याही न्यायालयात, विद्यापीठात किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणात / संस्थेत उमेदवाराविरूध्द कोणेतेही प्रकरण प्रलंबित आहे काय ? होय ☐ नाही ☐

(१३ (अ) किंवा १३ (ब) चे उत्तर होय असेल तर हा अर्ज भरतांना सदर खटला, अटक, स्थानबध्द, दंड, दोषसिध्दी, शिक्षादेश इत्यादींचा संपूर्ण तपशील आणि न्यायालय/ विद्यापीठ / शैक्षणिक प्राधिकरणात इत्यादी ठिकाणी प्रलंबित असलेल्या प्रकरणांचे स्वरूप स्पष्ट करावे.)

## अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र

मी.श्री./सौ./कु.......................................................................... याव्दारे प्रतिज्ञापुर्वक असे जाहीर करतो/ करते की, वरील माहिती जाणीवपुर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. अर्जात नमुद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी निवड / नियुक्ती रदद केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जात नमुद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्यास त्याची पुर्णपणे जबाबदारी माझी राहील व त्याबाबतीत माझ्याविरूध्द कायदेशीर कारवाईस मी पात्र राहीन. तसेच मी भरती प्रक्रियमध्ये कोणत्याही प्रकाराची वशिलेबाजी किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास मी अपात्र ठरेन.

ठिकाण :

दिनांक :

अर्जदाराची सही
(दिनांकासह)

**सोबत : अर्जात नमूद केलेल्या बाबींच्या आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित केलेल्या छायांकीत प्रती सोबत जोडाव्यात.**